महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ❖ ०१ जून २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक ३३३ ❖ पाने - ४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

## वालधुनी नदी की कंपन्यांच्या रासायनिक सांडपाण्याचा नाला ?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : शहराच्या मध्यातून वाहणारी आणि एकेकाळी स्वच्छ जलप्रवाह म्हणून ओळखली जाणारी वालधुनी नदी सध्या भयावह रूपात दिसून येत आहे. उल्हासनगरच्या वडोल गावातून वाहणाऱ्या नदीच्या प्रवाहात मोठ्या प्रमाणावर पांढऱ्या फेसाचे अस्तित्व दिसून येत आहे. या फेसामागे अंबरनाथ एमआयडीसी आणि उल्हासनगरातील काही रासायनिक कंपन्यांनी नदीत थेट सोडलेले रासायनिक सांडपाणी हे प्रमुख कारण असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. वालधुनी नदीचा उगम अंबरनाथजवळील डोंगरांमध्ये होतो. ती उल्हासनगर शहरातील वडोल गाव, कॅम्प क्रमांक ३ मार्गे शहरातून पुढे वाहते. सध्या या संपूर्ण प्रवाहात पांढऱ्या फेसाची चादर पसरलेली दिसून येत आहे. या फेसातून येणारी दुर्गंधी संपूर्ण परिसराला वेढून टाकली आहे. यामुळे आसपास राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यावरही विपरित परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. नागरिकांच्या आणि पर्यावरण कार्यकर्त्यांच्या मते, अंबरनाथ एमआयडीसीमधील अनेक रासायनिक आणि डाय कंपन्या सांडपाण्यावर प्रक्रिया न करता ते थेट नदीत सोडतात. या कंपन्यांवर वेळोवेळी कारवाईची मागणी होत असूनही, प्रशासनाची भूमिका केवळ कागदावर मर्यादित राहिली आहे. परिणामी, प्रदूषणाचा भयंकर स्तर दिवसेंदिवस वाढत चालला आहे. वालधुनी नदीतून सध्या पाणी नाही, तर प्रदूषण वाहत आहे. हा प्रश्न केवळ



पर्यावरणाचा नाही, तर उल्हासनगरच्या हजारो कुटुंबांच्या आरोग्याचा आहे. प्रशासनाने वेळेवर कठोर निर्णय घेतला नाही, तर ही फेसाळलेली नदी भविष्यात शहरासाठी महामारीचे कारण ठरू शकते, अशी प्रतिक्रिया उमटू लागली आहे. नागरिकांमध्ये संताप नदीच्या प्रवाहात पाण्याच्या जागी आता फेस आणि घाण दिसू लागली आहे. नदीचे स्वरूप इतके बदलून गेले की ती 'नदी' आहे की 'रासायनिक नाला', असा प्रश्न नागरिक करू लागले आहेत. उल्हासनगर परिसरातील हजारो नागरिक या नदीच्या सान्निध्यात राहत असल्याने हे प्रदूषण आरोग्यासाठी थेट संकट बनू शकते. त्वचा विकार, श्वसनाचे त्रास, डेंगी-मलेरिया यांसारख्या साथींच्या आजाराचा धोका वाढत आहे.

### प्रशासन, प्रदूषण मंडळ कुठे आहे?

महसूल, पर्यावरण आणि नगरविकास विभागांकडून यावर ठोस कारवाईची अपेक्षा असूनही संबंधित यंत्रणा निष्क्रिय असल्याची टीका होत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडूनही या प्रकाराकडे अद्याप गांभीर्याने लक्ष दिले नाही. यामुळे सामाजिक संघटना आणि पर्यावरणप्रेमींकडून तीव्र संताप व्यक्त केला जातो आहे.

### मुख्य समस्या

* दुर्गंधीयुक्त प्रवाहामुळे आरोग्य धोक्यात
* एमआयडीसीतून सरळ सांडपाणी नदीत
* प्रशासन आणि मंडळाची उदासीनता
* रासायनिक पाण्यामुळे भविष्यासाठी गंभीर इशारा

**थोडक्यात महत्वाचे**

## अधिकाऱ्यांच्या बदल्यांमुळे अंबरनाथ नगर परिषदेत संमिश्र वातावरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

अंबरनाथ : अंबरनाथ नगरपालिकेतील सात स्वच्छता निरीक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. मात्र, त्यापैकी चार स्वच्छता निरीक्षक इतर नगर परिषदांतून अंबरनाथमध्ये रुजू होणार आहेत. त्यातील तीन पदे रिक्त राहणार आहेत. हे रुजू होणाऱ्या निरीक्षकांच्या आकडेवारीवरून दिसून येते. शहरात स्वच्छतेच्या मुद्द्यावरून आरोप-प्रत्यारोप होत असतात, त्यात पावसाळा जवळ येऊन ठेपला आहे. सध्या तरी नव्याने आलेल्या चार निरीक्षकांवर मोठी जबाबदारी पडणार हे निश्चित. त्यामुळे अंबरनाथ नगर परिषदेत संमिश्र वातावरण निर्माण झाले आहे. अंबरनाथ नगरपालिकेतील राज्यस्तरीय संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या शासकीय धोरणानुसार झाल्या आहेत. इतर नगर परिषदांतून अधिकाऱ्यांच्या बदल्या अंबरनाथ नगर परिषदेत झाल्या आहेत. जूनच्या पहिल्या आठवड्यात त्यांना बदलीच्या ठिकाणी रुजू व्हावे लागणार आहे. नगर परिषद प्रशासन संचालकांच्या आदेशानुसार राज्यातील बहुतेक सर्व नगरपरिषदेतील संवर्गातील अधिकाऱ्यांच्या ३० मे रोजी बदल्यांचे आदेश काढले आहेत. या शासकीय धोरणानुसार अंबरनाथ नगर परिषदेमध्येही विविध खात्यांतील अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. काही अधिकाऱ्यांच्या अंबरनाथजवळच बदलापूर नगरपरिषदेत तर काहींच्या बदल्या सातारा, रत्नागिरी, पालघर, ओझर आदी ठिकाणी बदल्या झाल्या आहेत.

### टिटवाळ्यातील मुलाचे मृत्यूप्रकरण

## सुबराव खराडे यांना अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : शाळेच्या संरक्षण भिंतीचे बांधकाम केल्यानंतर त्याला सीमेंटचे प्लास्टर करण्यात आले नव्हते. त्यामुळे भिंतीच्या विटा उघड्या पडल्या होत्या. प्लास्टर नसल्याने या संरक्षण भिंतीला भेगा पडल्या होत्या. परिसरातील चाळीतील रहिवाशांनी शाळेचे संचालक सुबराव खराडे यांच्याकडे संरक्षण भिंत दुरुस्तीची मागणी केली होती. अनेक वेळा मागणी करुनही सुबराव खराडे आणि शाळा व्यवस्थापनाने रहिवाशांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले, असे तक्रारीत म्हटले आहे. शुक्रवारी ही धोकादायक संरक्षण भिंती इमारत आमच्या मुलांच्या अंगावर कोसळली. या सर्व घटनेला शाळा संचालक सुबराव खराडे यांचा निष्काळजीपणा, दुर्लक्षितपणा जबाबदार असल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी मृत मुलाच्या आईच्या तक्रारीवरून शाळा संचालक खराडे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

## बाजार समितीच्या १८ जागांसाठी १५४ अर्ज दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीची संचालक पदाची निवडणूक 29 जुन रोजी होणार असुन अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी154उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत,
संचालक पदाच्या एकूण 18जागा असुन त्या मध्ये शेतकरी सेवा सोसायटि मतदार संघ 11 जागा,ग्रामपंचायत मतदार संघ





4जागा ,माथाडी,, इत्यादी मतदार संघ आहेत, 2जुन रोजी छाननी होणार आहे, तर 3जुन ते 17जुन अर्ज मागे घेण्याची तारीख आहे, तर18जुन रोजी उमेदवारांना निशाणी वाटप व 29 जुन रोजी मतदान व त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे,
महाराष्ट्र मध्ये प्रसिद्ध आसलेली कल्याण कृषी उत्पन्न बाजार समिती होय,बाजार समितीवर महायुती कि महाविकास आघाडीचा झेंडा फडकणार हे लवकरच समजेल,संचालक पदाच्या निवडणूक साठी माजी नगरसेवक मयूर पाटील, माजी सभापती कपिल थले,रवींद्र घोडविंदे,मंगळ म्हसके,भुषण जाधव, अरुण जाधव, वंडार पाटील,मधुकर मोहफे,, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हा अध्यक्ष भाऊ गोंधळे, शिवसेना तालुका प्रमुख वसंत लोणे, नरेश सुरोशी, राजाराम चौधरी, संजय शेलार, सदाशिव सासे, मोहन नाईक, शंकर आव्हाड, विधा पाटील, आदेश चौधरी, यांच्या सह आजी माझी संचालक सह उमेदवाराच्या रिंगणात उभे आहेत,

## उन्हाळी भातपिके अवकाळीने जमीनदोस्त



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : तालुक्यातील भाजीपाला तसेच दुबार उन्हाळी भातपिके घेणाऱ्या शेतकऱ्यांचे अवकाळी पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्याची मागणी शहापूर भाजपने केली आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला भातसा धरणाच्या उजव्या कालव्यावर तालुक्यातील आवरे, कांबारे, चेरपोली, तुते, अर्जुनली, पिंपळपाडा, काळेपाडा, कवडास सरलांबे, साजिवली, सावरशेत, खुटारी, खरीवली गावांमधील शेतजमीन ओलिताखाली आहे. येथील शेतकरी उन्हाळी भात तसेच भाजीपाल्याचे पीक घेतात. पण अचानक आलेल्या अवकाळी पावसाने त्याचे नुकसान झाले आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांनी विनंती करूनही भातसा धरण विभागाने १ मेदरम्यान कालव्याचे पाणी बंद केले नसल्याचा फटका पिकांना बसला आहे. शेतातील भाताचे उभे पीक भिजत पडले आहे. तसेच पालेभाज्या सडल्याने या नुकसानीचे त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी मंगळवारी (ता. २७) भाजपच्या आदिवासी आघाडीचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक इरनक यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी, पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार परमेश्वर कासुळे यांची भेट घेऊन केली आहे.

## मानवी मूल्यांसाठीच महामानवांचा संघर्ष

### – बलभीम माथेले

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : जात, धर्म आणि पंथांच्या भेदातून मुक्तता मिळावी, तसेच समानता व मानवी मूल्यांसाठीच सर्व महामानवांनी संघर्ष केला. सर्वच महामानवांच्या विचारांमागे मानवतेच्या हिताचा एक समान धागा आहे. या विचारांचा जागर करण्यासाठी महावितरणच्या कल्याण परिमंडलाकडून आयोजित करण्यात येत असलेल्या महामानवांच्या संयुक्त जयंती उत्सवाचा उपक्रम कौतुकास्पद व अनुकरणीय आहे, असे प्रतिपादन व्याख्याते बलभीम माथेले यांनी केले. महावितरणच्या कल्याण परिमंडलाच्या वतीने कार्यालयाच्या सभागृहात



गुरुवारी (ता. २९) सायंकाळी आयोजित महामानवांच्या संयुक्त जयंती उत्सवात ते बोलत होते. सलग चौथ्या वर्षी परिमंडलाकडून संयुक्त जयंती उत्सवाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा होते. माथेले यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराज ते महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील वैचारिक नात्याची गुंफण उलगडून दाखवली. तसेच भगवान गौतम बुद्धांपासून संत परंपरेतील नामदेव, ज्ञानेश्वर, तुकाराम, रोहिदास, सेवालाल, गाडगेबाबा आदी संतांच्या विचारांमधील समतेच्या धाग्यांची उकल त्यांनी केली. राजमाता जिजाऊ, अहिल्यादेवी, सावित्रीबाई फुले यांनी रुजविलेल्या जनकल्याणकारी मूल्यांचा जागर त्यांनी केला. महामानवांच्या विचारांपासून कर्मचाऱ्यांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने उपक्रमात सातत्य ठेवल्याचे मुख्य अभियंता मिश्रा यांनी स्पष्ट केले. या वेळी कल्याण मंडल एकचे अधीक्षक अभियंता अनिल थोरात, कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता विजय फुंदे, सहाय्यक महाव्यवस्थापक सुशील पावसकर, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी रामगोपाल अहिर हे उपस्थित होते. अभियंते, अधिकारी, कर्मचारी, विविध संघटनांचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांडुरंग गायके यांनी केले, तर औदुंबर कोकरे यांनी आभार मानले.









# गीतासार



## अध्याय १२
## भक्तियोगः

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव । मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ॥ १२-१० ॥

जर तू वर सांगितलेल्या अभ्यासालाही असमर्थ असशील, तर केवळ माझ्याकरता कर्म करायला परायण हो. अशा रीतीने माझ्यासाठी कर्मे केल्यानेही माझ्या प्राप्तीची सिद्धी तू मिळवशील. ॥ १२-१० ॥

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः । सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ १२-११ ॥

जर माझ्या प्राप्तिरूप योगाचा आश्रय करून वर सांगितलेले साधन करायलाही तू असमर्थ असशील, तर मन बुद्धी इत्यादींवर विजय मिळविणारा होऊन सर्व कर्मांच्या फळांचा त्याग कर. ॥ १२-११ ॥

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते । ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥ १२-१२ ॥

मर्म न जाणता केलेल्या अभ्यासापेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे. ज्ञानापेक्षा मज परमेश्वराच्या स्वरूपाचे ध्यान श्रेष्ठ आहे आणि ध्यानापेक्षाही सर्व कर्मांच्या फळांचा त्याग श्रेष्ठ आहे. कारण त्यागाने ताबडतोब परम शांती मिळते. ॥ १२-१२ ॥

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च । निर्ममो निरहङ्कारः समदुःखसुखः क्षमी ॥ १२-१३ ॥ सन्तुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः । मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः ॥ १२-१४ ॥

जो कोणत्याही भूताचा द्वेष न करणारा, स्वार्थरहित, सर्वांवर प्रेम करणारा व अकारण दया करणारा, माझेपणा व मीपणा नसलेला, दुःखात व सुखात समभाव असलेला आणि क्षमावान म्हणजे अपराध करणाऱ्यालाही (त्याच्या पश्चातापानंतर) अभय देणारा असतो; तसेच जो योगी नेहमी संतुष्ट असतो, ज्याने शरीर, मन व इंद्रिये ताब्यात ठेवलेली असतात, ज्याची माझ्यावर दृढ श्रद्धा असते, तो मन व बुद्धी मलाच अर्पण केलेला माझा भक्त मला प्रिय आहे. ॥ १२-१३, १२-१४ ॥

## रेसिपी
# साऊथ स्टाईल नारळाची चटणी



**साहित्य**

किसलेले ओलं खोबर १ कप, हिरवी मिरची २-३ ,१ इंच आल्याचा तुकडा ,भाजलेली चना डाळ २ टेस्पून ,चवीनुसार मीठ , आवश्यकतेनुसार पाणी ,- तेल १ टेस्पून - मोहरी १ टीस्पून , उडीद डाळ १ चमचा , कढीपत्ता एक चिमूटभर हिंग

**कृती**

मिक्सरमध्ये किसलेले खोबरे, हिरवी मिरची, आले, भाजलेली चणाडाळ आणि मीठ घालून एकत्र करा. हळूहळू त्यात पाणी घाला आणि दाटसर पेस्ट तयार होईपर्यंत फिरवा. - आता एका छोट्या कढईत तेल गरम करा. त्यात मोहरी टाका आणि तडतडू द्या. - नंतर उडीद डाळ, कढीपत्ता आणि हिंग घाला. -डाळ तांबूस, सोनेरी होईपर्यंत काही सेकंद तळा. -वाटलेल्या नारळाच्या मिश्रणावर फोडणी घाला आणि चांगले मिसळा. आता त्यात चवीनुसार मीठ घाला.

# अधिकृत भ्रष्टाचाराला 'सर्वोच्च' चपराक !

**सुधीर लक्ष्मीकांत दाणी**
**बेलापूर नवी मुंबई**

सर्वोच्च न्यायालयाच्या दट्ट्यानंतर एमएमआरडीए ला ठाणे घोडबंदर बोगदा व उन्नत मार्गाची निविदा पारदर्शकतेसाठी व लोकहितासाठी रद्द करण्याची उपरती झालेली आहे . एमएमआरडीएची माघार म्हणजे भ्रष्टाचार मुक्त पारदर्शक कारभाराच्या उक्ती विसंगत कृती करणाऱ्या सरकारला आणि एमएमआरडीएला हि सर्वोच्च चपराकच ठरते . मा . उच्च न्यायालयाचे आदेश कायम न ठेवता मा . सर्वोच्च न्यायालयाने वेगळी भूमिका घेत मनमानी पद्धतीने कारभार करणाऱ्या एमएमआरडीएला चपराक लगावत तब्बल ३ हजार रुपयांनी कंत्राटाची रक्कम करण्यास भाग पाडले यासाठी मा . सर्वोच्च न्यायालयाचे करदात्या नागरिकांच्या वतीने अभिनंदन आणि आभार !

भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाच्या पार्श्वभूमीतून २०१४ नंतर 'नव भारताचा ' उदय करण्यासाठी आलेले केंद्र सरकार असो की भ्रष्टचाराचे आम्हीच कर्दनकाळ असे सांगत "मी पुन्हा येईन " याची आश्वासनपूर्ती करणारे सरकार असो , यांच्या उक्ती आणि कृतीत फार मोठी विसंगती आहे हे एव्हाना अनेक प्रकरणांतून सुस्पष्ट झालेले आहे . ठाणे -भाईंदर बोगदा व उन्नत मार्गाची निविदेत संपूर्ण जगभर गुणवत्ता आणि तंत्रज्ञानाचा नावलौकिक असणाऱ्या एल अँड टी ला अपात्र ठरविण्याचा प्रकार हा एमएमआरडीए च्या आणि सरकारच्या 'हेतू ' वरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे . सरकारी टेंडर आणि त्यासाठी कंपन्यांना असणारी आवश्यक पात्रता यात नेमका कोणता 'बॉण्ड ' महत्वाचा असतो हे निवडणूक रोखे प्रकरणातून सिद्ध झालेलेच आहे .

जर एल अँड टी ची याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली असती तर सदरील प्रकल्प हा तब्बल '३ हजार कोटी ' अधिकचे देऊनच बिनदिक्कतपणे व बिनभोभाटपणे पूर्णत्वास गेला असता . अलीकडच्या काळात राज्य व केंद्र सरकारचे धोरण हे भ्रष्टचाराला "अधिकृत " कवचकुंडले देण्याचे दिसते .मुळातच विकासकामांचे कंत्राटे हि " मोठ्या प्रमाणावर रक्कम फुगवून " द्यायचे . सरकारच्या दृष्टीने "पात्र " असणाऱ्या कंपन्यांना अशी कंत्राटे देऊन त्यातील फुगवलेली रक्कम आपल्या पदरात पाडून घेत "सबका साथ ,सबका विकास " या घोषणेची कृतियुक्त पूर्तता करायची . राज्य सरकरचे "डीएसआर रेट " हे प्रत्यक्ष बाजारातील रेटच्या काही पटीने अधिक ठेवण्याचा प्रकार हा 'अधिकृत ' भ्रष्टचाराचाच एक प्रकार ठरतो .

सर्वात महत्वाचा प्रश्न हा आहे की एमएमआरडीए च्या अधिकाऱ्यांनी जी निविदा मेघा इंजिनियरिंग कंपनीला दिली होती ती आता एल अँड टी या कंपनीला द्यायची वेळ आल्यावर ३ हजार कोटींनी निविदा कमी होण्यामागे नेमका कोणता 'अर्थ ' दडलेला आहे ? एमएमआरडीए ने रद्द झालेली निविदा काढताना दर सुनिश्चित करण्यासाठी जे निकष लावलेले होते त्या निकषात आता कोणता इतका आमूलाग्र बदल झाला की थेट ३ हजार कोटींनी निविदा रक्कम ढासळली ?

असो ! भ्रष्टाचाराच्या बाबतीत कितीही कोळसा उगाळला तरी तो काळाच अशा प्रकार आहे . राज्य व केंद्र सरकारने आता तरी किमान भ्रष्टाचार निर्मूलनाचे ज्या घोषणा केलेल्या होत्या त्या दृष्टीने 'कृतियुक्त ' पाऊले उचलावीत . अन्यथा मतदारांसमोर अंधश्रद्धेतून बाहेर पडून आगामी निवडणुकांमध्ये 'डोळसपणे ' योग्य ठिकाणी मतदानाचे 'बोट ' टेकवून सरकारचेच निर्मूलन करण्याशिवाय पर्याय उरणार नाही .






# लालपरीला वाढदिवसाच्या शुभेच्छा!



महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या एसटीचा आज म्हणजे १ जूनला ७७ वा वाढदिवस आहे. १ जून १९४८ रोजी पुणे - नगर या मार्गावर पहिली एसटी धावली होती. आज एसटी महामंडळाचा विस्तार झाला आहे. गाव तेथे एसटी, रस्ता तिथे एसटी या ब्रीदवाक्यनुसार एसटीचा विस्तार होत गेला. गावागावात आज एसटी पोहचली आहे. एकूण ३१ विभागातून एसटीचे कामकाज केले जाते त्याचप्रमाणे आंतरराज्यीय सेवा देखील पुरवली जातेय. कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यात आज एसटी पोहचली आहे. राज्यातील कोट्यवधी प्रवाशांच्या लाडक्या लालपरीने काळानुसार कात टाकली असून, अनेक बदलही केले आहेत. लालपरीपासून हिरकणी, शिवनेरी, शिवशाही आता विठाई असा एसटीचा चेहरामोहरा बदलत गेला आहे. एसटी म्हणजे केवळ प्रवाशांची वाहतूक एव्हढेच मर्यादित नसून एसटीने सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली आहे. राज्यावर आलेल्या भूकंप, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीत एसटीने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे यासाठी एसटीने पुढाकार घेत प्रवासात सवलती दिल्या आहेत. खेड्यापासून शाळा कॉलेजमध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांचे हक्काचे वाहन म्हणजे एसटीच. ग्रामीण भागातील करोडो विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ एसटीमुळेच पूर्ण होऊ शकले. म्हणूनच राज्यातील करोडो प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आदराची भावना आहे. एसटी म्हणजे ग्रामीण भागासाठी वरदानच आहे. ग्रामीण भागात आजही एसटी हेच दळणवळणाचे प्रमुख साधन आहे. जनतेचा प्रवास सुखकर व्हावा, प्रवाशांना तत्पर आणि वक्तशीर सेवा मिळावी यासाठी एसटीचे कर्मचारी झटत असतात पण गेल्या काही वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात असल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधकारात बुडाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात आहे त्यामुळे महामंडळाने नवीन कर्मचाऱ्यांची भरती केलेली नाही. कंत्राटी पदे भरून एसटीचे खाजगीकरण करण्याचा अट्टाहास केला जात आहे त्यामुळे कर्मचारी आणि महामंडळ यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे या वादात प्रवाशी मात्र भरडले जात आहेत म्हणूनच सरकारने एसटीच्या खाजगिकरणाचा अट्टाहास सोडून एसटीला सशक्त करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कंत्राटी ऐवजी कायमस्वरूपी कर्मचारी नेमून त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन आणि सुविधा दिल्यास महामंडळाला पुन्हा सुगीचे दिवस येतील. प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आपुलकीची आणि आदराची भावना आहे. सरकारनेही एसटी कडे आपुलकीने पाहिल्यास एसटीला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल. राज्यातील प्रवाशांच्या मनात मानाचे स्थान असलेल्या आणि सर्वांच्या लाडक्या लालपरीला म्हणजेच एसटीला ७७ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार,दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# 'आरटीई' टप्पा क्र. ४ प्रवेशासाठी मुदतवाढ

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता 'आरटीई २५%' ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत टप्पा क्रमांक ४ मधील निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पालकांना प्रवेश पूर्ण करण्यास अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे.

पूर्वी दि. २९ मे २०२५ पर्यंत मुदत देण्यात आलेली असताना, पालकांचा प्रतिसाद लक्षात घेता व काही अपूर्ण प्रवेश प्रक्रियेस संधी देण्यासाठी आता ही मुदत दि. ०९ जून २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

महत्त्वाची सूचना पालकांसाठी:

- टप्पा क्र. ४ मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे पालक यांनी प्रवेश अद्याप पूर्ण केला नसेल, त्यांनी अलॉटमेंट लेटर व आवश्यक कागदपत्रांसह नजीकच्या पडताळणी केंद्रावर जाऊन प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करावी.




- ही मुदतवाढ अंतिम असून, दि. ०९ जून २०२५ नंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. त्यामुळे सर्व पालकांनी वेळेत प्रवेश निश्चित करावा.

**प्रवेशप्रक्रिया आता ९ जून २०२५ पर्यंत**

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी आवाहन केले की, "शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे. आरटीई अंतर्गत मिळणारी ही प्रवेश संधी सर्व पात्र विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी, यासाठी पालकांनी वेळेत आणि नियमबद्ध पद्धतीने प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी."

ठाणे जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती व महानगर पालिका अंतर्गत एकूण ६२७ पात्र शाळा असून एकूण ११ हजार ३२० रिक्त जागा उपलब्ध होते व आतापर्यंत ८ हजार ५३९ प्रवेश झाले आहेत.

अधिक माहितीसाठी: संकेतस्थळ: https://student.maharashtra.gov.in तसेच मदतीसाठी स्थानिक शिक्षण विभाग / BEO कार्यालय येथे संपर्क करावा, असे आवाहन शिक्षण विभागामार्फत करण्यात येत आहे.

### म्हारळपाड्या जवळील ओमकार नगर येथे राहणाऱ्या
# मागासवर्गीय कुंटूबावर अमानुष अत्याचार

## अ‍ॅट्रॉसिटी कायद्यातंर्गत सात आरोपी अटक!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील म्हारळपाड्या जवळील ओमकार नगर परिसरात राहणाऱ्या एका मागासवर्गीय (हिंदू महार) कुटुंबावर जातीय द्वेषातून झालेल्या हल्ल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विकी नाना भालेराव (वय 30) आणि त्यांची पत्नी दुर्गा (वय 25), तीन महिन्यांची गरोदर असताना, त्यांच्यावर आणि त्यांच्या चिमुकल्या मुलीसमोर अमानुष मारहाण व छळ करण्यात आल्याने येथील७ आरोपींच्या विरोधात अँट्रॉसिटी कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



ही घटना २४ मे रोजी घडली. म्हारळपाडा येथील संग्राम देशमुख व त्यांच्या कुटुंबीयांनी चोरीच्या संशयावरून विकी भालेराव दांपत्याला घरी बोलावून घेतले. त्यानंतर दरवाजा बंद करून विकीला लाकडी दांडे, लोखंडी हातोडीने मारहाण करण्यात आली. पीडिताच्या गुप्तांगात जबरदस्तीने वस्तू घालून शारीरिक छळ करण्यात आल्याची माहिती आहे. त्यांच्या पत्नीवरही अत्यंत अमानवीपणे मारहाण करण्यात आली आणि जातीय अपमानकारक भाषा वापरून त्यांचा मानसिक छळ करण्यात आला.

घटनेनंतर आरोपींनी धमकी दिल्यामुळे पीडितांनी तात्काळ तक्रार नोंदवली नाही. मात्र, रुग्णालयात उपचार घेत असताना ही घटना सामाजिक कार्यकर्त्यांच्या निदर्शनास आली. त्यानंतर बहुजन समाज व विविध पुरोगामी संघटनांचे प्रतिनिधी एकत्र आले आणि त्यांनी पोलिसांशी संपर्क साधत तात्काळ कारवाईची मागणी केली.

रिपब्लिकन पार्टीचे सुनील सोनवणे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे संतोष रोकडे, आंबेडकरी नेते अंबादास वाघ, इस्माईल शेख, भीम आर्मीचे अनिल चव्हाण, तात्या सपकाळे व अ‍ॅड. सचिन गांधी यांच्या शिष्टमंडळाने टिटवाळा पोलीस ठाण्यात वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुरेश कदम व डीवायएसपी शिंदे यांची भेट घेतली.

पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्काळ कारवाई केली. आरोपी संग्राम देशमुख व त्यांच्या कुटुंबातील इतर सहा सदस्यांविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा (अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्ट) आणि भारतीय दंड संहितेच्या विविध गंभीर कलमांअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.कल्याण तालुक्यातील वकिलांची संपूर्ण फौज विकी भालेराव या पिडिताच्या पाठिमागे खंबीरपणे उभी राहणार असल्याचे समजते, शिवाय आंबेडकर समाज देखील या विरोधात रस्त्यावर उतरणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे

# नवीन वेळापत्रकानुसार ई-बसेसचा पुरवठा होणार !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : प्रवाशांना दर्जेदार सुविधा मिळण्यासाठी शासन नेहमीच प्रयत्न करीत असते. त्यानुसार इवे ट्रान्स प्रा. लि. कंपनीकडून 5150 ईलेक्ट्रीक बसेस भाडेतत्त्वावर घेण्याबाबत करार करण्यात आला. प्रवाशांना या बसेसच्या माध्यमातून सुविधा मिळण्यासाठी नवीन वेळापत्रकानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला ई- बसेसचा पुरवठा करावा, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

मंत्रालयात आयोजित बैठकीत परिवहन मंत्री श्री. सरनाईक बस पुरवठ्याबाबत आढावा घेताना बोलत होते. बैठकीस अपर मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, कंपनीचे के. व्ही प्रदीप आदी उपस्थित होते. बस पुरवठादार कंपनीने दिलेल्या वेळापत्रकानुसार बस पुरवठा करणे अपेक्षीत असल्याचे सूचीत करीत परिवहन मंत्री श्री. सरनाईक म्हणाले, कंपनीने दिलेल्या बसेसचा चालनीय तोटा लक्षात घेता, राज्य शासनाकडून निधी मिळण्यासाठी व्यवहार्यता अंतर अर्थपुरवठ्यासाठी (viability gap funding) चा प्रस्ताव पाठविण्यात यावा. कंपनीने आतापर्यंत 220 बसेसचा पुरवठा केला आहे. उर्वरित पुरवठा सुधारित करारानुसार करण्यासाठी कंपनीने नियोजन करावे.

# नैसर्गिक आपत्ती टाळण्यासाठी यंत्रणा सतर्क

### आपत्कालीन उपाय आणि महसूलकर्मचारी यांच्याकडून ठेवले जाणार आपत्कालीन परिस्थितीवर लक्ष...

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड: मुरबाड तालुक्यात आपत्ती व्यवस्थापन टिम सज्ज ठेवण्यात येऊन मुरबाड तालुक्याची भौगोलिकता हि शहरीभागा पैक्षा दुप्पट लोकवस्तीचे असलेला बहूलभाग आहे, माळशेज घाट, डोंगराळ दुर्गमभागात मोठ्या प्रमाणात अदिवासीची वस्ती आहे , नदिनाल्यावर पुरपरिस्थीती निर्माण होते, पावसाळ्यात येथे आपत्कालीन परिस्थिती निर्माण होतच असते. त्यामुळे ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या दूरदृष्टी नियोजनाच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार अभिजीत देशमुख यांनी मानसुनपुर्वीच मे महिण्यातील वळवाच्या पावसांचा अंदाज घेऊन दि १४/५/२०२५ व दि २५/०५/२५ रोजी सर्व विभाग प्रमुखांच्या बैठक घेऊन सूचना दिल्या. तसेच तहसील कार्यालयात आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करून कार्यान्वित करण्यात आला आहे. या आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि कक्षाच्या कामकाजावर तहसिलदार देशमुख स्वता लक्ष ठेवून नियोजन करीत आहेत. महसूल विभागाची स्वतंत्र्यटिम चोविसतास कार्यरत ठेवून असणार आहेत. डोंगर ,वनराई, ग्रामिणभाग त्यामुळे पावसाल्यात वादळी वाऱ्याने झाडे कोलमडून पडणे, झाडे रस्त्यावर पडणे तसेच घरांच्या भिंती कोसळणे, नागरिक आपत्कालीन स्थितीत अडकने आदी आपती येऊ शकतात. नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्याचे आदेश तलाठी व ग्राम सेवक याना देण्यात आले आहेत. जर आपत्ती परिस्थिती मधे शासकीय यंत्रणा यांनी योग्य पद्धतीने कार्यवाही केली नाही तर नैसर्गिक आपत्तीं व्यस्थापन कायद्या अंतर्गत कारवाई करण्यात येईल असे निर्देश दिले आहेत. त्यामुळे तालुकाभरात मे महिण्यातच पुर्व मान्सूनची तयारी म्हणून आपत्ती व्यवस्थापन टिम कार्यन्वित करण्यात आल्याचे तहसिलदार यांनी सांगितले.







## आजचे राशिभविष्य



**मेष**
अशी एखादी व्यक्ती भेटेल जिच्याकडून तुम्हाला काहीतरी शिकायला मिळेल. ऑफिसच्या काही कामांमुळे अचानक प्रवास करावा लागू शकतो.

**वृषभ**
कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत संयम राखाल आणि तुमच्या परिस्थितीत लवकरच सुधारणा होताना दिसेल. तुमच्या यशाचा मार्ग सापडेल.

**मिथुन**
तुम्ही काही महत्त्वाचे निर्णय घेऊ शकता जे तुमची आर्थिक स्थिती आणि घरातील व्यवस्था राखण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात.

**कर्क**
एकत्रितपणे केलेल्या कामात तुम्हाला मोठ्या प्रमाणात यश मिळेल.वडिलांचे आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहतील. उर्जेने खूप काही साध्य कराल.

**सिंह**
फक्त तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. आज एखाद्या खास व्यक्तीच्या मदतीने तुमची प्रलंबित कामे पूर्ण होतील.काम पूर्ण गांभीर्याने होईल.

**कन्या**
घरातील वरिष्ठांचेही सहकार्य मिळेल. कामाच्या ठिकाणी वास्तुचे नियम पाळल्यास सकारात्मक परिणाम मिळतील.आरोग्य निरोगी राहील.

**तूळ**
कोणाशीही विनाकारण वाद घालू नका. यामुळे संबंध बिघडेल आणि तुमचे कामही विस्कळीत होईल. तुम्ही काही महत्त्वाच्या बाबींवर निर्णय घेऊ शकता.

**वृश्चिक**
तुम्हाला धार्मिक आणि सामाजिक कार्यात रुची असू शकते. कोणतीही योजना कृतीत आणली तर कोणतेही ध्येय साध्य होईल आणि मन प्रसन्न राहील.

**धनु**
धार्मिक कार्यात तुमची आवड वाढेल. कामात व्यस्त राहा आणि अनावश्यक कामात रस घेऊ नका. आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल आहे.

**मकर**
कोणताही निर्णय घेण्यात आराम वाटेल.आपल्या कुटुंबासाठी थोडा वेळ काढल्याने नात्यात गोडवा येईल. कामाचे परिणाम अनुकूल असतील.

**कुंभ**
घरात सुख-शांतीचे वातावरण राहील.दिवस तुमच्यासाठी सुवर्ण दिवस असणार आहे. घरात निवांत आणि शांततापूर्ण वातावरण असेल.

**मीन**
तुमच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. तुम्हाला कामात जास्त मेहनत करावी लागेल, कामाची कार्यक्षमता कमी होऊ देऊ नका. व्यक्तिमत्व सुधारेल.



# ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन



ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने कै.नरेंद्र बल्लाळ सभागृहात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीनिमित्त त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, प्र.उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# भिवंडी महानगरपालिकेमध्ये अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी



भिवंडी : सामान्य प्रशासन विभागाचे दि. १८.०२.२०२५च्या परिपत्रकान्वये आणि महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से.) यांचे निर्देशानुसार आज दिनांक ३१.०५.२०२५ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालयात तळ मजल्यावर श्री. बाळाराम जाधव, सहा. आयुक्त प्रभाग समिती क्र.५ यांचे हस्ते पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन केले.

या प्रसंगी सुरक्षा व क्रिडा अधिकारी श्री. मिलींद पळसुले व महानगरपालिकेचे कर्मचारी उपस्थीत होते.

# कल्याणात महाराणा प्रताप सिंग जयंती संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : कल्याणातील महाराणा क्षत्रिय राजपूत समाज सेवाभावी संस्थेच्या वतीने महाराणा प्रताप सिंग जयंतीचे आयोजन केले होते. कल्याण पश्चिमेतील सिध्दी विनायक हॉल मध्ये गुरूवारी महाराणा प्रताप सिंग जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्ताने भव्य मिरवणूक काढण्यात आली.

दुर्गाडी किल्ल्याजवळील रस्ता परिसरातील चौकास महाराणा प्रताप चौकाचे नामकरण देखील करण्यात आले. या प्रसंगी पाचोरा विधानसभेचे आमदार, राजपूत समाजाचे नेते किशोर पाटील उपस्थित होते. महाराणा क्षत्रिय राजपूत समाज सेवाभावी संस्था कल्याणच्या वतीने अध्यक्ष संजय राजपूत व त्यांच्या संपूर्ण टीमने कार्यक्रमाचे चांगल्या प्रकारे नियोजन केलं होतं.

याप्रसंगी महाराणा क्षत्रिय राजपूत सेवाभावी संस्थेच्या वतीने ठाणसिंग पाटील यांना संस्थेतर्फे राजपूत समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. किशोर पाटील यांच्या हस्ते यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल योगेश राजपूत यांचा सत्कार करण्यात आला.सूत्रसंचालन सचिव गोकुळ पाटील , सुवर्णा राजपूत यांनी केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कार्याध्यक्ष विनोद राजपूत यांनी केले. कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे मुख्य सल्लागार एम जी पाटील, विष्णू सिंग परदेशी, उपाध्यक्ष दिलीप पाटील, कोषाध्यक्ष व्ही आर पाटील, सहसचिव निलेश देवरे, सहकोषाध्यक्ष भूपेंद्र राजपूत, रवींद्र पाटील, रामसिंग राजपूत, महाराणा प्रताप यांच्या वेशभूषेत भटेसिंग राजपूत होते. तसेच, विशेष अतिथी विजयसिंह पाटील, आर के पाटील, महेंद्रसिंग राजपूत, सोनू सिंग राजपूत, संपर्कप्रमुख सोपान पाटील, महेंद्रसिंग जाधव, योगेंद्रसिंग राजपूत. भिकन देवरे उपस्थित होते. ठाणे डोंबिवली अंबरनाथ बदलापूर मुंबई उपनगर मधून, मुरबाड शहापूर येथील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्वांच्या सहकार्याने व महिला आघाडीने संपूर्ण सजावट व कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी अथक प्रयत्न केले.

# मोटार सायकल चोरीचे गुन्हे पोलिसांकडून उघडकीस

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : १२ मे २०२५ रोजी कोळसेवाडी पोलीस स्टेशनमध्ये अॅक्टीवा स्कुटर चोरीचा गुन्हा दाखल होता. वरीष्ठ पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना मिळालेल्या गोपनीय बातमी वरून आंबीवली, कल्याण येथुन गुन्हयातील आरोपी करण गायकवाड, वय २२ वर्षे, यास गुन्हयात चोरीस गेलेल्या ४० हजार रू किमतीची लाल रंगाच्या स्कुटीसह ताब्यात घेतले असून त्याने हा गुन्हा केल्याची कबुली देवुन त्यास विश्वासात घेवुन अधिक विचारपुस केली असता त्याने विष्णूनगर पोलीस स्टेशन, डोंबीवली पश्चिम हददीतुन दोन मोटार सायकल चोरी केल्याची कबुली दिली असुन अधिक तपास सुरू आहे.

हि कामगिरी पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे व सहा. पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, कोळसेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सपोनि दर्शन पाटील, पोहवा राजेश कापडी, भागवत सौंदाणे, मिंलीद बोरसे, शांताराम सांगळे, भगवान सांगळे, पोशि दिलीप सोनावळे यांनी केली आहे.

# कल्याण पश्चिमेतील नाना नानी पार्क बनलंय अबालवृध्दांचे विरुगंळा केंद्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : कल्याण पश्चिमेतील फडके मैदान परिसरातील धर्मवीर आनंद दिघे उद्यान नाना नानी पार्क हिरवाई, पेरीफेरी, बसण्यासाठी पर्णकुटी व्यवस्था बच्चे कंपनीची खेळणी या सुविधामुळे कामाच्या वाढत्या व्याप दमलेल्यासाठी क्षणभर विरूगंळा केंन्द्र बनलेल्या नाना नानी पार्क साठी माजी नगरसेवक मोहन उगले यांनी पाठपुरावा करीत सुमारे 1.50कोटीचा निधी उपलब्ध करीत साकरलेल्या या पार्क मध्ये बुधवारी रात्री कल्याण पश्चिमचे आमदार विश्वनाथ भोईर, शिवसेना जिल्हाप्रमुख अरविंद मोरे महिला जिल्हाप्रमुख छाया वाघमारे, शहर प्रमुख नेत्रा उगले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये विद्युत सिस्टीम म्युझिक सिस्टीम लोकाअर्पण सोहळा संपन्न झाला.



पावसाचे धुंद वातावरण आणि पारंपरिक मराठी गाणी आणि नानापार्क मधील विघुत सिस्टीम मुळे झालेल्या लखलखाटामुळे वातावरण प्रसन्न वाटत होते. याप्रसंगी मोहन उगले यांनी प्रशासनाकडे पाठ -पुरावा करीत डंपिंग जागा असलेल्या जागेत प्रचंड इच्छा शक्ती नागरीसुविधासाठी काम करण्याचा घेतलेला वसा यामुळे या जागेचा कायापालट करीत हिरवाई ने नटलेल्या नाना नानीपार्कमध्ये रूपांतर करीत कायापालट केला आहे असे प्रतिपादन केले.

आमदार विश्वनाथ भोईर यांनी मोहन उगले यांच्या कामाचे कौतुक करीत अन्य भागात देखील असे काम करून नागरीहिताच्या कामाचा वसा जोपसावा. नागरी विकास कामासाठी खिशातला पैसा प्रसंगी आमची तयारी असते, काँक्रीटकरण, शहरीकरणाचा वेग पाहता शहारामध्ये अशी हिरवाई ने नटलेली ठिकाणे असणे देखील महत्वाचे विकास कामे, पायाभूत सुविधा या कामाच्या जोरावर कल्याणाचा चेहरामोहरा बदलत आहे. 15 वर्षोपूर्वेचे कल्याण आज विकास कामामुळे बदलले असल्याचे बाहेरून येणारे म्हटले पाहिजे असे प्रतिपादन या प्रसंगी केले. याप्रसंगी "क" प्रभागाचे सहाय्यक आयुक्त धनंजय थोरात, विघुत विभागाचे अभियंता भागवत पाटील आदींसह नागरिक अबालवुध्द, मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाणे जिल्ह्यात पुर परिस्थितीबाबत प्रशासन सतर्क

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जून ते सप्टेंबर या कालावधीत राज्यात व जिल्ह्यांमध्ये पुर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने तसेच यावर्षी मान्सून लवकर दाखल झाल्याने पहिल्याच पावसात तात्पुरत्या स्वरूपाची पुरपरिस्थिती निदर्शनास आली आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी अशोक शिनगारे आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी जिल्ह्यातील यंत्रणेला सतर्क राहण्याचे आदेश दिले असून, विस्तृत उपाययोजना अंमलात आणल्या जात आहेत.

**प्रमुख उपाययोजना:**

**१. आपत्ती व्यवस्थापन कक्षांचा समन्वय**

जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कक्ष पुरस्थितीवर दैनंदिन नियंत्रण ठेवत आहे.

पंचायत स्तरावरील तालुकास्तरीय कक्षांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील कक्ष, वागळे सर्कल रोड नंबर 22, जिल्हा परिषद ठाणे येथील साथरोग नियंत्रण कक्षाशी नियमित संपर्कात राहण्याचे निर्देश

**२. आरोग्य पथकांची तैनात**

मोठ्या लोकसंख्येच्या गावात 2 महिला व 2 पुरुष कर्मचारी,

तर लहान गावात 1 महिला व 1 पुरुष कर्मचारी 24x7 सेवा देणार.

या पथकांकडे औषधसाठा व तातडीच्या तपासणीसाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध.

**३. पुरेसा औषध साठा व शुद्धीकरण साहित्य**

TCL पावडर, मेडीक्लोर, इत्यादी पाणी शुद्धीकरण साहित्य ग्रामपंचायतीमध्ये उपलब्ध करून ठेवण्याच्या सूचना.

साथीचे आजार उदभवू नये म्हणून आवश्यक सर्व औषधांचा साठा उपलब्ध ठेवण्याच्या सूचना.

**४. दैनंदिन रुग्ण सर्वेक्षण**

घराघरांत आशा व आरोग्य कर्मचारी भेट देऊन ताप, जुलाब, सर्दी, अतिसार यांचे सर्वेक्षण करून आढळलेल्या रुग्णांवर तातडीचे उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणार.

गंभीर रुग्णांना संदर्भित संस्थेकडे पाठविण्याची व्यवस्था.

**५. किटकजन्य आजार नियंत्रण**

तापाचे रुग्ण आढळणाऱ्या भागात रक्तनमुने गोळा करून तपासणी.

चिकनगुनिया/डेंग्यू संशयित ठिकाणी रक्तनमुने प्रयोगशाळेत पाठवणार.

20% घरांतील पाणी साठ्याची तपासणी करून अळयांचे प्रमाण निश्चित करणार.

डासोत्पत्ती स्थळी अळीनाशक फवारणी.

**६. विस्थापितांसाठी आरोग्य सेवा**

पाण्यामुळे घर सोडलेल्या नागरिकांसाठी शाळा/ देवालये / मंगल कार्यालयांमध्ये

वैद्यकीय पथकांमार्फत तपासणी व औषधोपचार.

**७. आरोग्य शिक्षण व जनजागृती**

मायकिंग, भित्तीपत्रके व इतर माध्यमांतून स्वच्छतेबाबत आणि टाळावयाच्या गोष्टींबाबत माहितीप्रसार.

**८. पाणी गुणवत्ता नियंत्रण**

जलसुरक्षकामार्फत पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया.

पाणी नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवणे.

आरोग्य सेवक आणि सहाय्यकांकडून प्रतिदिन निरीक्षण.

**९. ब्लीचिंग पावडर गुणवत्ता नियंत्रण**

गुणवत्तेची तपासणी झालेली पावडरच वापरण्याचे आदेश.

साठा ग्रामपंचायत मुख्यालयी ठेवण्याची सूचना.

**१०. पाणी पुरवठा गळती दुरुस्ती**

नळ किंवा व्हाल्वमधील गळती तत्काळ दुरुस्त करण्याचे निर्देश.

**11. गरोदर मातांची विशेष काळजी**

संभाव्य प्रसूती तारीख लक्षात घेऊन उच्च जोखमीच्या गरोदर महिलांची यादी.

गरजेनुसार त्यांना आरोग्य संस्थांमध्ये हलवले जाणार.

**12. सर्पदंश आणि विंचूदंश उपचार व्यवस्था**

संबंधित औषधांचा पुरेसा साठा सर्व प्राथमिक केंद्रांवर उपलब्ध.

प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नेमणूक.

**13. लेप्टोस्पायरोसिस प्रतिबंध**

पुराच्या पाण्यात काम करणाऱ्यांसाठी डॉक्सिसायक्लिन औषधाचा प्रतिबंधात्मक वापर मार्गदर्शक सूचनांनुसार.

**14. आंतरविभागीय समन्वय**

जलसंपदा, ग्रामविकास, कृषि, पशुसंवर्धन, नगरविकास विभाग यांच्यात तालुका स्तरावर समन्वय साधून कारवाई.

ही सर्व उपाययोजना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबद्धपणे राबविण्यात येत असून, पुरपरिस्थितीत जिल्हा प्रशासन सज्ज आहे, अशी माहिती प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. दिनेश सुतार यांनी दिली आहे.

# अहिल्याबाई होळकर यांना केडीएमसीतर्फे अभिवादन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंती दिनी आज कल्याण डोंबिवली महापालिकेतर्फे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालयात महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यासमयी माहिती व जनसंपर्क विभागाचे उपआयुक्त संजय जाधव, कार्यकारी अभियंता मनोज सांगळे, सहा.जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत, सहा. सुरक्षा अधिकारी सुरेश पवार, इतर कर्मचारी व अनेक समाजबांधव उपस्थित होते.

त्याचप्रमाणे अहिल्याबाई चौकातील अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यासही महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. अहिल्याबाई होळकर यांचे महिला सशक्तीकरणाचे विचार समाजातील नागरिकांनी आठवण केली पाहिजे, असे प्रतिपादन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी कल्याण डोंबिवली शहर हिंदु खाटीक समाज संघटनेमार्फत आयोजित अहिल्याबाई होळकर यांच्या 300व्या जयंती दिनी कार्यक्रमात केले.

**अहिल्याबाई होळकर यांचे महिला सशक्तीकरणाच्या विचारांची समाजातील नागरिकांनी आठवण केली पाहिजे !**

**- केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल**

यावेळी महापालिका माहिती व जनसंपर्क विभागाचे उपआयुक्त संजय जाधव, कल्याण डोंबिवली शहर हिंदु खाटीक समाज संघटनेचे शहर अध्यक्ष समीर मानकर, महिला अध्यक्षा मिनाक्षी खराटे, युवा अध्यक्ष ओमकार निकम व महापालिका कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने समाजबांधव व नागरिक उपस्थित होते.

# आयरे गावातील अनधिकृत बांधकामे केडीएमसीने पाडली



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या ग प्रभाग अंतर्गत, दिनांक २९ मे रोजी आयरे गावात गटार व नाल्याच्या साफसफाईसंदर्भात प्रभागाच्या सहा. आयुक्त हेमा मुंबरकर यांनी निरीक्षण व पाहणी केली. यादरम्यान संबंधित परिसरात अनधिकृत चाळीचे बांधकाम आढळून आले.

पाहणीवेळी महापालिकेच्या ग प्रभागाच्या पथकास १५ जोत्यांचे (फाउंडेशन) बांधकाम व ५ पूर्ण झालेल्या खोल्यांचे अनधिकृत बांधकाम निदर्शनास आले. सदर बांधकाम सार्वजनिक गटार व नाल्यावर अतिक्रमण करून करण्यात आले होते, त्यामुळे महापालिकेच्या ग प्रभागाच्या अतिक्रमण विरोधी पथकाद्वारे त्वरित निष्कासन कारवाई करून हे अनधिकृत बांधकाम पाडून टाकण्यात आले आणि परिसरात स्वच्छता व मोकळेपणा राखण्यात आलेला आहे. महापालिकेने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बांधकाम वा अतिक्रमण सहन केले जाणार नाही आणि याविरोधात सातत्याने कठोर पावले उचलली जातील.




# सुधारित संचमान्यतेचा शासन निर्णय रद्द करावा

## शिक्षण क्रांती संघटनेची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार सुधारित संचमान्यता आदेश शाळांना ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यामुळे अनेक अनुदानित शाळा बंद पडणार असल्याने हा शासन आदेश तातडीने रद्द करून पुर्वीच्याच निकषांनुसार संचमान्यता करण्याची मागणी शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस यांनी शालेय शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांकडे निवेदनाद्वारे केली आहे.


बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क या अधिनियमाचा चुकीचा अर्थ काढून प्राथमिक विभागाची संच मान्यता करण्यात आली आहे. त्याचबरोबर माध्यमिक विभागाकरीताही सुधारित निकष लावल्याने अनेक अनुदानित शाळा बंद पडण्याच्या मार्गावर असून मोठ्या प्रमाणात शिक्षक अतिरिक्त होणार आहेत.

राज्यात शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टल लागू केल्यामुळे अनुदानित शाळांमध्ये हजारो शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, शिक्षणावरील खर्च वाचवण्यासाठी शासनाने जागोजागी मुबलक प्रमाणात स्वयंअर्थसहाय्यित शाळा सुरू केल्याने पालक व विद्यार्थी तिकडे आकर्षित होत आहेत. अशा काही कारणांमुळे मराठी माध्यमाच्या अनुदानित शाळांमध्ये विद्यार्थी प्रवेश घेत नाहीत. यावर उपाययोजना आखण्याऐवजी शासन जाचक निकष लावून शाळा जाणीवपूर्वक बंद पाडू पाहात आहे की काय अशी शंका निवेदनात उपस्थित केली आहे.

मराठी माध्यमाच्या शाळांना संजीवनी मिळावी व त्या वाढल्या नाहीत तरी निदान आहेत त्या तरी टिकाव्यात यासाठी शासनाने उच्च न्यायालयाने दिलेल्या २३ एप्रिल व ६ मे २०२४ च्या अंतरिम आदेशाचा संदर्भ देत १५ मार्च २०२४ चा सुधारित संच मान्यता आदेश तातडीने रद्द करावा व पुर्वीप्रमाणेच संच मान्यता आदेश उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी सुधीर घागस यांनी प्रधान सचिवांकडे केली आहे.

# ऐरोली विभागात अनधिकृत बांधकामावर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



नवी मुंबई : नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (2) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) श्री. भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने ऐरोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील जी विभाग ऐरोली अंतर्गत विवेक कोटकर व ईतर, विनिता अपार्टमेंटच्या मागे, ऐरोली गाव, सेक्टर-20, ऐरोली येथील आरसीसी इमारतीचे बांधकाम नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे सुरु केले होते. सदर अनधिकृत बांधकामास ऐरोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 मधील कलम 54 अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरु ठेवले होते. सदरचे अनधिकृत बांधकाम नमुंमपाच्या अंतर्गत अंशत: निष्कासित करण्यात आले आहे. या धडक मोहिमेसाठी 3 ब्रेकर, 2 हॅमर, 1 गॅस कटर, 10 मजूर व 01 मुकादम यांचा वापर करण्यात आलेला असून, मोहिमेकरीता जी विभाग ऐरोली येथील अतिक्रमण विषयक अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते. सदर कारवाई अंतर्गत सदर बांधकाम धारकाकडून रूपये 50,000/- प्रमाणे दंडात्मक शुल्क वसूल करण्यात आले आहे. यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.



# म्हसा येथे अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान!

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड : २९ मे २०२५ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त खांबलिंगेश्वर देवस्थान म्हसा येथे महाआरती करण्यात आली तसेच म्हसा गावातील महिलांमार्फत स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. या कार्यक्रमासाठी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष जितेंद्र भावार्थे तसेच कन्होळ गावच्या सरपंच रेश्मा घरत, भारतीय जनता पार्टीचे कोषाध्यक्ष बाळा घरत, भारतीय जनता पार्टीचे म्हसा बूथ प्रमुख संजय कुर्ले, काळुराम वाघ, जगदीश म्हसे तसेच ग्रामपंचायत माजी सरपंच सुवर्णा घागस, सदस्य लता ढमणे, माधुरी गायकर, वारा वाघ, विकी घागस, तसेच म्हसा गावातील महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दाखवली.

# मर्जीतला प्रशासक नेमण्यासाठी प्रभाकर देसाईचे दबावतंत्र

## बेकायदेशीर निर्णय झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा सेव्ह पेंढारकर मोहिमेचा इशारा

### उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्री, सचिव, शिक्षण संचालक उच्च शिक्षण यांना दिले पत्र

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : महाराष्ट्र शासनाने केवी पेंढारकर स्वायत्त महाविद्यालयावर प्रशासकाची नियुक्ती केली असून महाविद्यालयावर आपल्या मर्जीतला प्रशासक नेमण्यासाठी डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे तथाकथित अध्यक्ष प्रभाकर देसाई दबावतंत्राचा वापर करत असल्याचा आरोप सेव्ह पेंढारकर मोहीमेने केला असून बेकायदेशीर निर्णय झाल्यास त्यांच्या दालनात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सेव्ह पेंढारकर मोहिमेने दिला आहे. याबाबत या मोहिमेचे रोहिदास सुरवसे यांनी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्री चंद्रकांत पाटील, सचिव वेणुगोपाल रेड्डी, शिक्षण संचालक उच्च शिक्षण डॉ. शैलेन्द्र देवळणकर यांना पत्र दिले आहे.

पेंढारकर महाविद्यालयातील प्रशासकाने दिनांक 29 एप्रिल 2025 रोजी महाविद्यालयामध्ये येऊन प्रशासकीय कारभार हाती घेतल्या त्यानंतर त्यांनी नियोजन बद्ध पद्धतीने त्यांचे काम अत्यंत व्यवस्थित चालू आहे. सर्वांना बरोबर घेऊन विद्यार्थ्यांच्या हिताचे धोरण स्वीकारून महाविद्यालय सुरळीत करण्याचे काम केले आहे. सध्या प्रवेश प्रक्रिया त्यांच्याच मार्गदर्शनाखाली अत्यंत चांगल्या पद्धतीने सुरू झालेली आहे शासकीय नियमानुसार विद्यापीठ व यूजीसीच्या नियमानुसार चालू आहे डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे तथाकथित अध्यक्ष यांच्या मार्फत वेगवेगळ्या ठिकाणी दबाव आणून कार्यरत असलेले प्रशासकावर वेगवेगळ्या पद्धतीने दबाव आणून सध्या कार्यरत असलेले प्रशासकांना काम करणे कठीण जात आहे. तसेच ते नेहमी प्रशासकाच्या कारभारामध्ये हस्तक्षेप करू पाहत आहेत व प्रशासकीय कामकाजात अडथळा निर्माण करीत आहेत. जेणेकरून नियुक्त प्रशासक हटवून आपल्या मर्जीतील योग्य वाटेल असा प्रशासक नियुक्त करून स्वतःची काम योग्यरीता मनमानी पद्धतीने करणारा आपल्या मर्जीतील प्रशासक नियुक्त करण्याच्या तयारीत असल्याचा आरोप सुरवसे यांनी केला आहे. प्रभाकर देसाई हे मंत्रालयात व शासनावर दबाव आणत आहे, तसे झाल्यास शासन हे देसाईच्या हातातले कळसूत्री बाहुले आहे की काय असा समज जनमाणसात प्रसारित होईल व शासन निर्णयाची व डोंबिवलीकरांच्या विश्वासाची नाचक्की होईल. त्यामुळे उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुद्ध आपण जाऊन कॉलेजमध्ये नियुक्ती केलेले प्रशासक त्यांच्या मर्जीतला आणावा व कॉलेजमधला विनाअनुदानित विभाग व्यवस्थापनाकडे सोपवावा असा कुठल्याही बेकादेशीर निर्णय बेकायदेशीर निर्णय आपल्या विभागाकडून झाल्यास त्याच्या दुसऱ्या दिवशी पासून आपल्या दालनात तीव्र आंदोलन पुकारले जाईल. प्रभाकर देसाई यांच्या मार्जिप्रमाणे निर्णय झाल्यास कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता आपल्या दालनात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. तेव्हा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याची संपूर्ण जबाबदारी आपली राहील असा इशारा सेव्ह पेंढारकर मोहिमेचे रोहिदास सुरवसे यांनी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्री चंद्रकांत पाटील, सचिव वेणुगोपाल रेड्डी, शिक्षण संचालक उच्च शिक्षण डॉ. शैलेन्द्र देवळणकर यांना पत्राद्वारे दिला आहे.

# अर्धवट पुलाच्या कामाविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व मनसेचे जोरदार निषेध आंदोलन





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण शीळ मार्गावरील पलावा येथील अर्धवट पुलाच्या कामा विरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व मनसेचे जोरदार निषेध आंदोलन केल्याने राज्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व मनसे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येण्याची नांदी या आंदोलना मुळे दिसून आले. दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते उत्साहाने सत्ताधारी पक्षा विरोधात नागरी प्रश्ना बाबत रस्त्यावर उतरल्याने भवितव्यात दोन्ही पक्ष एकत्रित पालिका निवडणुकी लढण्यासाठी सज्ज झाले आहेत.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि कल्याण जिल्हा प्रमुख दिपेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली, डोंबिवली व कल्याण ग्रामीण विधानसभेतील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन कल्याण-शीळ मार्गावरील पलावा येथे मागील आठ वर्षांपासून अर्धवट लटकलेल्या व बंद पडलेल्या पुलाच्या कामाविरोधात जोरदार निषेध आंदोलन केले.

या अर्धवट पुलामुळे परिसरात दररोज प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होते असून, त्यामुळे सामान्य नागरिकांना मोठा मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे. या ट्राफिक कोंडीमुळे कधी कधी शाळेच्या प्रशासनाला सुट्टी देखील देण्याची वेळ आली आहे. या पुलाचे काम पूर्ण न झाल्यामुळे तासांतास नागरिकांना या वाहतूक कोंडीत अटकून राहावे लागते. नागरिकांना सत्ताधारी पक्षाकडून या पुलाच्या उद्घाटना बाबत यापूर्वी अनेक वेळा खोट्या तारखा सांगून नागरिकांची फसवणूक करण्यात आली. ३१ मे रोजी पूल सुरू होईल, असे दिलेले आश्वासन देखील अपूर्ण राहिले. ही गंभीर फसवणूक लक्षात घेता, नागरिकांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचवण्यासाठी हे आंदोलन हाती घेण्यात आल्याचे सांगितले .

या आंदोलनात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते व कल्याण ग्रामीणचे माजी आमदार प्रमोद ( राजू) पाटील तसेच मनसेचे डोंबिवली, कल्याण ग्रामीण विभागातील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या उत्साहाने आंदोलनात सहभागी झाले होते.या आंदोलनं बाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिपेश म्हात्रे यांनी सांगितले की ही लढाई कोणत्याही पक्षाच्या विरोधात नसून, सामान्य नागरिकांच्या हक्कांसाठीची आहे.शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे दोन्ही पक्ष जनतेच्या प्रश्नांसाठी एकत्र लढण्यास कटिबद्ध असल्याचे सांगितले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते आणि कल्याण ग्रामीणचे माजी आमदार प्रमोद (राजू) पाटील यांनी सत्ताधाऱ्यांच्या निष्क्रियतेवर तीव्र शब्दात टीका करीत "सामान्य जनतेसाठी आम्ही सदैव एकत्र आहोत असे सांगितले.





नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता


# सेवानिवृत्त कर्मचा-यांना भिवंडी महानगरपालिकेचा निरोप



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
भिवंडी : महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानाप्रमाणे २५ कर्मचारी सेवानिवृत्त व स्वेच्छा निवृत्त झाल्याने महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त अनमोल सागर (भा. प्र. से) यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेतर्फे सेवानिवृत्त कर्मचा-यांना कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोप देणेत आला. याप्रसंगी अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यांत आला आणि त्यांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छाही दिल्या.

महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरी स्व. विलासराव देशमुख सभागृहात संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमातून १) श्री. राजेद्र वरळीकर (लिपीक तथा प्र. सहा. आयुक्त प्रभाग समिती. क्र.), २) श्री. नंदकुमार चौधरी, (अधिक्षक तथा अंतर्गत लेखापरिक्षक), ३) श्री. किसन पवार, (लिपीक), ४) श्रीम. नंदना सुर्वे (लिपीक), ५) श्री. आप्पा शिंदे, (सॅ.का. लिपीक), ६) श्री. नरेश साळवे (वाहनचालक), ७) श्री. मधुकर भोईर (मुकादम), ८) श्री. गुलचंद जाधव (सॅ. का), ९) श्री. शाम गायकवाड (सें. का), १०) श्री. दिलीप दुर्गावले (सें. का), ११) श्री. देवराम खैरे (सॅ. का), १२) श्री. विलास भोईर (सॅ. का), १३) सुरेश चव्हाण (सॅ. का), १४) श्री. संतोष चव्हाण (सॅ. का), १५) श्री. दत्ता जाधव (सें. का), १६) श्री. प्रकाश गायकवाड (सें. का), १७) श्री. परशुराम पाटील (सॅ. का), १८) श्री. जयहिंद पाटील (सॅ. का), १९) श्री. प्रकाश जाधव (सॅ. का), २०) श्रीम. वंदना गायकवाड, २१) श्रीम. गुलाब सोनावणे (सें. का), २२) श्रीम. अंजली भोईर (सें. का), २३) श्री. गणेश शेलार (सॅ. का), २४) श्री. प्रकाश दिनकर (सॅ. का), २५) श्रीम. इंदू कांबळे (सें. का) अशा २५ सेवानिवृत्त व स्वेच्छानिवृत्त मनपा कर्मचा-यांना महानगरपालिकेच्यावतीने आज निरोप देण्यांत आला. या प्रसंगी मनपा अधिकारी व कर्मचारी, सर्व कर्मचारी संघटना प्रतिनिधी, सेवानिवृत्त कर्मचा-यांचे कुटुंबातील सदस्य इ. उपस्थित होते.

# अर्जुन ढाकणे हा काळाच्या पुढील अभिनेता होता

## - नाट्य दिग्दर्शक राम दौंड यांचे प्रतिपादन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कल्याण येथील अभिनेते, कवी लेखक, गझलकार दिवंगत अर्जुन ढाकणे यांचे नुकतेच अकस्मात अपघाती निधन झाले. अर्जुन ढाकणे हे पू ल कट्टा कल्याण या संस्थेचे संस्थापक सदस्य होते. त्या अनुषंगाने अर्जुन ढाकणे यांच्या गुणांचा जागर करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पू ल कट्टा संस्थेने फुल कट्टा वाचनालय नक्षत्र उद्यान कल्याण येथे नुकतेच श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी नाट्य दिग्दर्शक, सिने, नाट्य अभिनेते राम दौंड श्रद्धांजलीपर भाषणात बोलत होते. ते पुढे म्हणाले की अर्जुन ढाकणे हा माझा मित्र होता कविता कशी लिहावी , त्या साठी काय वाचावे याबाबत मला धडे देत होता तेव्हाच तो मी दिग्दर्शन करीत असलेल्या नाटक, एकांकिका मध्ये अभिनय करीत होता. त्यावेळी अभिनय करताना त्याने आपल्यातला कवि कधीच आपल्या अभिनेत्यावर हावी होऊ दिला नाही. लाऊड अभिनय करण्याची प्रथा होती, पण ती हळूहळू कमी झाली त्यावेळेस अचूक ढाकणे याचा अभिनय सहज आणि नैसर्गिक होता. तो जेव्हा काम करीत तो अभिनय करतो की नाही असेच वाटायचे. ती पद्धत आत्ता सध्या अभिनय करताना वापरली जात आहे आपण जसे आहोत तसेच स्टेजवर जाणे व सहज अभिनय करणे ही पद्धत अर्जुन जवळजवळ 35 ते 40 वर्षापूर्वीच वापरीत होता यावरून तो काळाच्या पुढचा अभिनेता होता असे माझे मत आहे असे त्यांनी सांगितले. उपस्थित पू ल कट्टा संयोजक प्रा महेंद्र भावसार ,किशोर खराटे, संजय वाजपेयी , रमेश आव्हाड, ज्योती अय्यर, विजय यांनी अर्जुन ढाकणे यांच्या आठवणी, किस्से सांगून त्यांच्या आरस्पानी या काव्यसंग्रहातील कविता सादर करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी अर्जुन ढाकणे यांची मुले अद्वैत,स्वामी ही उपस्थित होते. यावेळी त्यांनी आपल्या वडिलांच्या आठवणींना उजळा देऊन त्यांचा काव्य संग्रह उपस्थितांना भेट दिला.

# गझलेचा आत्मा म्हणजे आर्त, व्याकुळ कारुण्य


## - प्रा. अशोक बागवे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : गझल ही उर्दूमधून मराठीमध्ये आली, तिला मराठीने स्वीकारले तेव्हढे अन्य भारतीय भाषांनी स्वीकारले नाही. गझलचा आत्मा म्हणजे आर्त, व्याकुळ कारुण्य असून वलास घेऊन, ऑनलाईन कविता, गझल करता येत नाही, ती रक्तात असावी लागते असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यक अशोक बागवे यांनी ठाणे येथे केले. नवी मुंबईकर साहित्यिक अशोक गुप्ते यांच्या 'हे झाड चेतनेचे' या गझल संग्रहाचे प्रकाशन २५ मे रोजी येथील मराठी ग्रंथसंग्रहालय सभागृहामध्ये पार पडले. त्याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे या नात्याने बोलत होते. याप्रसंगी विचारमंचावर ज्येष्ठ कवी साहेबराव ठाणगे, कवी सतीश सोळांकुरकर, ज्येष्ठ पत्रकार दुर्गेश सोनार, संवेदना प्रकाशनचे नितिन हिरवे व कवी अशोक गुप्ते उपस्थित होते. गुप्ते यांचा डीएनए कवीचा असून त्यांचा आत्मा आध्यात्मिक आहे. त्यामुळे त्यांनी रचलेल्या गझला या सुरेख झाल्या असल्याचे मतही प्रा. बागवे यांनी यावेळी व्यक्त केले. गुप्ते यांची शब्दांवरची पकड चांगली असून मनसोवत प्रेम करणाऱ्याला आध्यात्म नीट कळते असे विचार कवी सतीश सोळांकुरकर यांनी मांडले. तर अमृतराय हे पहिले गझलकार असून गझलेचे नाते संत साहित्याशीही आहे व त्या नंतरच्या काळात मग माधव ज्युलियन आणि नंतर सुरेश भट यांनी गझल लोकप्रिय केली. गझल ही कारागिरी नव्हे, तो प्रेयसीच्या विरहाबद्दलचा आर्त स्वर आहे असे पत्रकार-साहित्यिक दुर्गेश सोनार यावेळी म्हणाले.

अशोक गुप्ते या आपल्या नवी मुंबईकर मित्राला कवितेचा समृध्द वारसा असल्याचे नमूद करुन ठाण्यामध्ये गझल संग्रहाचा प्रकाशन सोहळा ठेवण्याची सूचना आपणच केल्याचे सांगत येथे दर्दी रसिक प्रेक्षक साहित्यिक कार्यक्रमांना चांगला प्रतिसाद देतात असे याप्रसंगी ज्येष्ठ कवी साहेबराव ठाणगे यांनी स्पष्ट केले. संवेदना प्रकाशनच्या नितिन हिरवे यांनी या कार्यक्रमाला जमलेली गर्दी पाहुन संवेदना व ठाणेकरांचे जणू हे संमेलनच भरले आहे असे सांगत या संमेलनाचे व नव्या पुस्तकाचे स्वागत करायला पावसानेही हजेरी लावल्याचे निरीक्षण नोंदवले. 'हे झाड चेतनेचे' या पुस्तकाचे अर्थपूर्ण मुखपृष्ठ बनवणाऱ्या सतीश भावसार यांचाही सत्कार यानिमित्त करण्यात आला. पुस्तकाचे लेखक अशोक गुप्ते यांनी गझल प्रकाराने आपल्याला कशी भुरळ घातली ते आपल्या प्रास्ताविकातून सांगत हे पुस्तक तयार होत असताना प्रा. बागवे व इतरांचे मार्गदर्शन कसे लाभले याची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर चित्ते यांनी नेटकेपणाने केले. या प्रकाशन सोहळ्यास मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पनवेल, कल्याण, डोंबिवली, बदलापूर, विरार, वसईसह पंढरपूरहुनही आलेल्या रसिक प्रेक्षकांनी गर्दी केली होती.


जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY



Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111



जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558


# 'आयुष्यावर बोलू काही' कार्यक्रमाला रसिकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : अचानक आलेला पाऊस आणि सोबत कविता व गाणी यांची विलक्षण रंगलेली गद्य पद्य मैफल कल्याणकरांनी नुकतीच अनुभवली. 'होरायझन इव्हेंटस्'ने आयोजित केलेल्या 'आयुष्यावर बोलू काही' कार्यक्रमाला रसिकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद लाभला.

नुकताच दोन हजार कार्यक्रमांचा टप्पा गाठलेला आणि गेल्या दोन दशकांहून अधिक काळ संगीतकार गायक डॉ. सलील कुलकर्णी आणि कवी संदिप खरे यांच्या 'आयुष्यावर बोलू काही' या शब्दसूरांच्या मैफलीला जगभरातील मराठी रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. कल्याण मधीलमैफलही विलक्षण रंगतदार ठरली. रसिकांचा उत्फूर्त प्रतिसाद हे मैफलीचे वैशिष्ट्य ठरले. अनेक लोकप्रिय गीतांना रसिकांनी सुरात कोरस दिला.

'जरा चुकीचे जरा बरोबर बोलू काही', ' दूर दूर नभापार, डोंगराच्या माथ्यावर सरीवर सरी', 'मन तळ्यात-मळ्यात', 'अग्गोबाई-ढग्गोबाई' अशी एकामागून एक सरस गाणी मैफलीत सादर झाली. गाणी आणि कवितांदरम्यान डॉ. सलील कुलकर्णी आणि संदीप खरे रसिकांशी थेट संवाद साधत होते त्यामुळे रसिक ही ताल्लिन झाले होते.

'बंध मनाचे जुळले रे', 'गाडी सुटली रूमाल हलले, क्षणात डोळे टचकन ओले', 'हे भलते अवघड असते', 'नसतेस घरी तू जेव्हा', 'आताशा असे हे मला काय होते, कुण्या काळचे पाणी डोळ्यात येते', 'मी मोर्चा नेला नाही' अशी अनेक लोकांच्या स्मरणात आणि ओठांवर असणारी गाणी मैफलीत सादर करण्यात आली.

त्यातील काही गीतांना वन्समोअर मिळाला. 'ऐसे काही व्हावे, मन शांत निजावे' या मनाच्या अंगाई गीताने मैफलीची सांगता झाली. मैफली दरम्यान डॉ. सलील कुलकर्णी यांनी त्यांची सध्या समाज माध्यमावर गाजत असलेली 'नवीन डेटा पॅक दे रे, आभाळावर थुंकीन म्हणतो' ही कविता सादर केली. तसेच संदीप खरे यांनी 'आजी', 'सायकल' अशा काही कविता सादर केल्या. काही लोकप्रिय गीतांची ध्वनिमुद्रित न झालेली कडवीही त्यांनी ऐकवली. शब्दसुरांच्या या श्रवणीय मैफलीत आदित्य आठल्ये (तबला) आणि रितेश ओहोळ (गिटार) तोलामोलाची साथ दिली.

प्रशांत दांडेकर आणि स्वप्नील भाटे यांच्या होरायझन इव्हेंटस् चा हा रौप्य महोत्सवी कार्यक्रम होता. आचार्य अत्रे रंग मंदिराच्या वर्धापनदिनीच ही श्रवणीय मैफल पार पडली हा आणखी एक योगायोग. असेच दर्जेदार कार्यक्रम भविष्यातही सादर करू आणि कल्याणकर त्यांना ही असाच प्रतिसाद देतील असा विश्वास प्रशांत दांडेकर यांनी व्यक्त केला.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024